ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९२५

# अर्थ

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख १३ सप्टेंबर, १९५३ | अंक १८

## विविध माहिती

**सांगली जिल्ह्यांतील शतायुषी**—द. महाराष्ट्रांतील सांगली जिल्ह्यांत ५.३ माणसांनीं शंभराची आयुर्मर्यादा गांठून पुढें मजल मारली आहे, असें समजतें त्यापैकीं २७ जण ११२ वर्षें वयाचे आहेत, ३ जण ११० चे आहेत, एकजण १०६ वयाचा आहे, ३ जण १०५ वर्षांचे आहेत, १ जण १०३ वयाचा आहे आणिं १ जण १०२ वयाचा आहे. खानेसुमारीच्या वेळीं ही माहिती जमा झाली आहे.

**जपानकडून भांडवली माल घेणार**—पाकिस्तान सरकारनें जपानकडून ४.१५ कोटी रुपये किंमतीचा भांडवली माल घ्याव-याचें ठरविलें असून त्यासाठी जरूर ते आयात-परवाने दिले आहेत. बहुतेक माल म्हणजे कापड-गिरण्यांची यंत्रसामुग्री आहे. ब्रिटनकडूनहि पाकिस्तान असा माल घेणार आहे. जपानच्या मालाची किंमत सावकाशीनें द्यावयाची आहे.

**विझगापट्टम् येथील कारखाना**—विझगापट्टम् येथील हिंदुस्थान शिपयार्ड कंपनीचे चालक कारखान्याचा विस्तार करण्याचा विचार करीत आहेत, असें समजतें. सध्यां कारखान्याच्या गोद्यांतून २ ते ३ बोटी दरवर्षी बांधता येतात. १९५४ पासून ४ बोटी बांधण्याची व्यवस्था करण्याचा चालकांचा इरादा आहे. भारतीय नियोजन मंडळानें दरवर्षी १२ बोटी बांधण्याचें उद्दिष्ट ठरविलें आहे. त्यास अनुसरून वरील कार्यक्रम आंखण्यांत येत आहे.

**बोटींच्या बांधणींत टिटॅनिअमचा उपयोग**—भारतांत ठिक-ठिकाणीं टिटॅनिअम हें खनिज सांपडतें. ह्या खनिजाचा उपयोग बोटी बांधण्यासाठी करण्याच्या हेतूनें भारतीय सरकार कांहीं परदेशी कंपन्यांशीं विचारविनिमय करीत आहे, असें समजतें. टिटॅनिअमचा पत्रा वजनाला हलका पण लोखंडी पत्र्यापेक्षा अधिक मजबूत असतो. सूर्याची शक्ति सांठवून कशी ठेवावी तें शिकण्यासाठीं एक भारतीय शास्त्रज्ञ सध्यां अमेरिकेला गेला आहे.

**फर्स्ट क्लासचे डबे आतां फक्त १५ मेन लाइन आगगाड्यांत सांपडतील**—१ आक्टोबर, १९५२ पूर्वी १,६०० आगगाड्यांत पहिल्या वर्गाचे डबे होते. पहिल्या वर्गाचे डबे कमी,कमी करण्याची योजना तेव्हां अंमलांत आली आणि सध्यां ५५० आगगाड्यांत पहिल्या वर्गाची सोय आहे. १ आक्टोबर, १९५३ नंतर फक्त १५ मेन लाइन गाड्यांत हे डबे रहातील. त्यांत पुणें-मुंबई वहातूक करणारी डेक्कन क्वीन आहे.

**कंपनीकायद्याचें बिल**—पार्लमेंटांत अर्थमंत्र्यांनीं मांडलेलें कंपनीकायद्याचें (१९५३) बिल विक्रीस तयार आहे. त्याची किंमत १ रु. ४ आणे असून तें मॅनेजर ऑफ पब्लिकेशन्स, सिव्हिल लाइन्स, न्यू दिल्ली यांचेकडे किंवा भारत सरकारच्या इतर बुकडेपोंकडे विकत मिळूं शकेल.

**बी. बी. सी. वर वापरण्यांत आलेल्या ४५ भाषा**—ब्रिटिश नभोवाणीच्या गेल्या वर्षांचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. अहवालांत असें नमूद करण्यांत आलें आहे कीं, गेल्या वर्षी नभोवाणीवरून ४५ निरनिराळ्या भाषांतून कार्यक्रम ध्वनिक्षेपित करण्यांत आले.

**ग्रामसुधारकांसाठी वर्ग**—उत्तर-प्रदेशांत ग्रामसुधारकांना त्यांच्या कार्याचें शिक्षण देण्यासाठी १२ केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. त्यांपैकी दोन गांधी-जयंतीच्या दिवशीं उघडण्यांत येतील. आतांपर्यंत अशा प्रकारच्या केंद्रांतून सुमारें ८५० कार्यकर्ते शिकून तयार झाले असून ते ग्रामसुधारणांच्या बाबतींत खेडुतांना मदत करीत आहेत.

**घोड्यांच्या पैदाशीचें केंद्र**—उत्तर-प्रदेश सरकारनें डेहराडून येथें उत्तम प्रतीच्या घोड्यांची पैदास करण्याकरतां एक केंद्र उघडण्यास मंजुरी दिली आहे. ह्या केंद्रांत घोड्यांची अवलाद सुधारण्यासाठीं कृत्रिम-गर्भधारणेच्या पद्धतीचा उपयोग करण्यांत येणार आहे. केंद्रासाठी एका जमीनदारानें जागा देऊं केली आहे.

**बिकानेरजवळील अवशेष**—बिकानेरजवळ प्राचीन संस्कृतीचे कांहीं अवशेष सांपडले असुन ते सिंधमधील हराप्पा येथें सांपडलेल्या सांस्कृतिक अवशेषांइतके जुने आहेत, असें समजतें. सिंधू नदीच्या खोऱ्यांत ४ हजार वर्षांपूर्वी जी संस्कृति नांदत होती, तिचेच हे अवशेष असावेत असें म्हणतात. अशीं प्राचीन स्थानें बहुतेक पाकिस्तानांत गेलीं आहेत.

**हातमागवाल्यांची सहकारी संस्था**—मध्य प्रदेशांतील स्टेट वीव्हर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटीनें हातमागाच्या कापडाच्या उत्पादनाची व विक्रीची व्यवस्था पहाण्यासाठीं २५ लाख रुपये भांडवलाची योजना तयार केली आहे. राज्य सरकार ह्या योजनेचा विचार करीत आहे. मालाच्या तारणावर गरजू विणकरांना मदत करण्यासाठी एक बँक स्थापन करण्याचाहि विचार चालू आहे.

**भारतामधील परकीय नागरिक**—गेल्या वर्षाच्या डिसेंबर महिनाअखेर भारतांत रहाणाऱ्या परकीय नागरिकांची संख्या ७८,००० होती, असें समजतें.

**अरब स्त्रियांचा जागा राष्ट्रवाद**—कैरो येथें अरब राष्ट्रांतील स्त्रियांच्या तीस संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक नुकतीच भरली होती. ह्या बैठकींत फ्रेंच मालावर, विशेषतः फ्रेंच सौंदर्यप्रसाधनांवर बहिष्कार घालण्यांत यावा अशी सूचना करण्यांत आली. सौंदर्य-प्रसाधनांपायीं फ्रान्समध्यें जाणाऱ्या पैशाचा उपयोग शस्त्रास्त्रें तयार करण्यासाठी आणि मोरोक्कोंत दडपशाही करण्यासाठी होतो, असा इषाराहि देण्यांत आला.

### चीनमधील संमिश्र अर्थव्यवस्था

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. ग्यानचंद दिल्ली येथील रोटरी क्लबांत भाषण करतांना म्हणाले कीं, चीनमधील अर्थव्यवस्था समाजवादी पद्धतीची होण्यास अद्याप पुष्कळ काळ लागेल. तथापि, संपूर्ण समाजवादी अर्थव्यवस्थेकडे ती झपाट्यानें पावलें टाकत आहे हें मात्र खरें आहे. चीनच्या सरकारनें समाजवाद मूर्तस्वरूपांत आणण्याचें ध्येय मान्य केलेलें आहे. परंतु सध्यां तें संमिश्र अर्थव्यवस्थेच्या मार्गानें जात आहे. छोट्या धंद्यांना देशाच्या अर्थव्यवस्थेंत बराच मोठा भाग मोकळा ठेवण्यांत आला आहे. चीनच्या राष्ट्रीय विकासाचा जो कार्यक्रम आंखण्यांत आला आहे त्यांत खाजगी उद्योगधंद्यांना नुसता वाव देण्यांत आला आहे असें नव्हे, तर त्यांची विकासाच्या कार्यक्रमाशीं जुळणीहि करण्यांत आली आहे. अवजड उद्योगधंद्यांपैकी बरेच उद्योगधंदे स्वतः सरकारच चालवीत आहे एकंदरीनें सर्व अर्थव्यवस्थेची वाटचाल समाजवादाच्या दिशेनें होत आहे. परकीय लोकांना अविश्वसनीय वाटेल तरी वस्तुस्थिति अशी आहे कीं, चीनची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण आणि आपोआप विकसित होणारी अशी झाली आहे. भांडवलाची निर्मिति होण्यासाठीं सर्वसामान्य जनतेंत जो उत्साह लागतो तो चीनच्या सरकारनें उत्पन्न केला आहे. अर्थात् त्यामुळें लोकांना अडचणी व दुःख ह्यांना तोंड द्यावें लागत आहे. युद्धामुळें झालेली हानि आणि नंतर मोकाट सुटलेली चलन-वृद्धि लक्षांत घेतां चीनच्या अर्थव्यवस्थेंत घडवून आणली गेलेली सुधारणा चकित करणारी आहे. पूर्वीची अर्थव्यवस्था म्हणजे नुसता गोंधळ होता. आतां त्या ठिकाणीं संघटित अर्थव्यवस्था स्थापन झाली आहे.

### भारताला जपान मदत करूं शकेल

जपानचें एक आर्थिक सदिच्छा मंडळ मुंबईला आलें आहे. मंडळाचे नेते मि. कोगेन वृत्तप्रतिनिधींशीं बोलतांना म्हणाले कीं, तांत्रिक सामुग्री आणि तंत्रज्ञ भारताला पाठवून जपान भारताच्या औद्योगीकरणाला मदत करूं शकेल. त्याचप्रमाणें भारत व जपान परस्परांच्या सहकार्यानें द. आशिआंतील आणि आग्नेय आशिआंतील लोकांचें रहाणीचें मान सुधारण्यास मदत करूं शकतील. मुख्यतः तीन बाबतींत जपान भारताला चांगली मदत करूं शकेल. (१) भारताच्या ग्रामोद्योगाच्या विकासाला जपानचें साह्य होऊं शकेल. (२) शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठीं जपानमधील लागवडीच्या पद्धतींचें ज्ञान भारताला मिळूं शकेल, आणि (३) भारतामधील मच्छीमारीच्या व्यवसायाचा विस्तार करण्यासंबंधी जपान सल्ला देऊं शकेल. जपानमध्यें अवजड उद्योगधंदे, खताचे कारखाने आणि रासायनिक कारखाने सोडले तर इतर बहुतेक उद्योगधंद्यांचा संबंध ह्या ना त्या रीतीनें ग्रामोद्योगाशीं पोंचतो. जपानच्या ग्रामीण भागांतील छोटेखानी उद्योग चांगले प्रगत झालेले आहेत. भारतीय उद्योगधंद्यांत प्रत्यक्ष भांडवल गुंतवून भारतीय उद्योगधंद्यांची वाढ करण्याच्या कामीं जपान पुढें येऊं शकणार नाहीं. कारण अशी भांडवलाची गुंतवणूक करणें जागतिक बँकेच्या परवानगीवर अवलंबून आहे. तथापि नवीन उद्योगधंदे काढण्यासाठीं आपली यंत्रसामुग्री जपान देऊं शकेल. जपाननें चीनशीं औद्योगिक संबंध प्रस्थापित करण्याचे प्रयत्न का केले नाहींत असा प्रश्न विचारण्यांत आला असता मि. कोगेन म्हणाले कीं, असे संबंध प्रस्थापित होण्याची फारशी आशा नाहीं. ह्याचें मुख्य कारण म्हणजे चीन कम्युनिस्ट पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं आहे. मि कोगेन ह्यांनीं भारतीय ग्रामोद्योगांना मदत करण्याची जी कल्पना बोलून दाखविली आहे, ती सध्यांच्या परिस्थितींत चिंतनीय वाटते.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ]    [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्यासेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप.    टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

# अर्थ

बुधवार, ता. २३ सप्टेंबर १९५३





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## बँकांची रिझर्व्ह बँकेकरवीं तपासणी व देखरेख

### तपासणीचा इष्ट परिणाम

बँकांची तपासणी करण्याचा रिझर्व्ह बँकेचा कार्यक्रम १९५० मध्यें सुरू झाला, त्याचा उद्देश बँकांची कार्यपद्धति सुधारून त्यांच्या आर्थिक बळकटीस मदत करणें, हा आहे. जुलै, १९५२ ते जून, १९५३ ह्या मुदतींत २४ शेडच्यूल्ड व ९९ बिगर-शेडच्यूल्ड बँकांची तपासणी पुरी झाली. म्हणजे, सर्व शेडच्यूल्ड बँका आतां एकदा तरी तपासून झाल्या आहेत. तपासलेल्या एकूण बँकांची संख्या ३७४ झाली आहे. त्यांपैकी २६५ बँकांची तपासणी बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या २२ व्या कलमाखाली, लायसेन्स देण्यासाठी झाली. बाकीच्या १०९ बँका ३५ व्या कलमाखाली तपासण्यांत आल्या. आणखी ७ बँका "मोरेटोरियम" च्या अर्जासंबंधांत तपासल्या, एक बँक "ती आपलीं देणीं देण्यास असमर्थ आहे" असें कोर्टास सर्टिफिकेट देण्यासाठी तपासली आणि एकीची तपासणी स्कीम ऑफ ॲरेंजमेंटच्या संबंधांत झाली. पूर्वींच्या तपासणीनंतर केलेल्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी ७ बँकांची २२ व्या कलमाखाली व ११ बँकांची ३५ व्या कलमाखाली फेरतपासणी करण्यांत आली. वर्षअखेर, दोन शेडच्यूल्ड बँकांची फेरतपासणी चालू होती. तपासणींत जे दोष आढळून आले, ते सुधारण्यासाठी संबंधित बँकांना योग्य त्या सूचना देण्यांत आल्या व त्यांनीं केलेल्या सुधारणांचे अहवाल मागविण्यांत आले. ३० जून, १९५३ अखेर २२ बँकांचे मासिक अहवाल व २३२ बँकांचे त्रैमासिक अहवाल रिझर्व्ह बँकेस त्यांनीं केलेली प्रगति दिग्दर्शित करीत होते. रिझर्व्ह बँकेचा सल्ला बँका तत्परतेनें मान्य करीत होत्या. कांहीं बँकांनीं केलेली प्रगति असमाधानकारक वाटली, त्यांना अधिक नेटानें कारभार सुधारण्याची सूचना देण्यांत आली. जेथें दोष गंभीर स्वरूपाचे होते व ते नष्ट करण्याची योजना असमाधानकारक होती, तेथें कडक उपाय अंमलांत आणावे लागले. तीन शेडच्यूल्ड बँकांचे चालक ठेवीदारांचें हित सांभाळण्यास असमर्थ आढळले; त्यांच्या बँका रिझर्व्ह बँक कायद्याच्या दुसऱ्या शेडच्यूलमधून वगळण्यांत आल्या. कांहीं बँकांनीं अंगीकारलेलीं धोरणें अशीं होतीं कीं त्यांच्या दैनंदिन कारभारावर देखरेख ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेला आपला एक अधिकारी नियुक्त करावा लागला. हा अधिकारी बँकेंत जरूरीप्रमाणें दररोज किंवा वारंवार जातो, हिशेबाचीं पुस्तकें तपासतो आणि डायरेक्टर बोर्डाच्या सभांस निरीक्षक ह्या नात्यानें उपस्थित रहातो. ३० जून, १९५३ अखेर सहा बँकांवर अशा तऱ्हेचें रिझर्व्ह बँकेचें निरीक्षण होतें.

बँकांच्या मुख्य अधिकाऱ्यांना फार मोठे अधिकार असल्यामुळें त्यांतील कित्येकांचा कारभार अनिष्ट झाला होता; कांहींच्या मुख्य अधिकाऱ्यांना बँकिंगच्या व्यवहाराचें नीट ज्ञान नव्हतें म्हणूनहि तोच परिणाम झाला. अशा बँकांनीं बँकिंग-सल्लागार नेमावेत, अशी रिझर्व्ह बँकेनें सूचना केली, तीप्रमाणें गेल्या वर्षी तीन बँकांनीं सल्लागारांची नेमणूक केली.

## बँकिंग कंपन्यांच्या कायद्याची अंमलबजावणी

बँकिंग कंपन्यांचा कायदा बँका काटेकोरपणें पाळतात किंवा नाहीं, ह्याकडे रिझर्व्ह बँकेचें सतत लक्ष असतें. ११ व्या कलमांत बँकांचें किमान भाग-भांडवल किती असावें, तें सांगितलेलें आहे. तितकें भांडवल ज्या बँका उभारूं शकल्या नाहींत, त्यांना रिझर्व्ह बँकेनें वेगवेगळ्या मुदती दिल्या. १५ मार्च, १९५३ ही अखेरची तारीख होती. कांहीं कंपन्यांनीं वसूल भांडवल व रिझर्व्ह वाढविलें, तर कांहींनीं जरूर तेवढें व्यवहारक्षेत्र कमी केलें. कांहींनीं बँकिंगचा व्यवहार बंद केला व त्या बिगर–बँकिंग कंपन्या बनल्या, तर कांहीं लिक्विडेशनमध्यें गेल्या. रिझर्व्ह बँक १५ मार्च, १९५३ नंतर मुदत वाढवूं शकली नाहीं, तेव्हां मुदत-वाढ हव्या असलेल्या उरलेल्या बँकांना मध्यवर्ती सरकारकडे ११ व्या कलमाची माफी मिळविण्यासाठी परस्पर अर्ज करण्यास सांगण्यांत आलें. बिगर–शेडच्यूल्ड बँकांनीं ठेवावयाचा किमान कॅश रिझर्व्ह १८ व्या कलमांत सांगितलेला आहे व एकूण देण्यांच्या किमान २०% रक्कम तरत्या जिंदगींत ठेवण्याचे नियम २४ व्या कलमांत दिलेले आहेत. ह्या कलमांचा भंग क्वचितच झालेला दिसला व ४६ व्या कलमाप्रमाणें बँकांवर उपाययोजना करण्याचा प्रसंग आला नाहीं. "ब" वर्गीय राज्यांत स्थापन झालेल्या व त्या राज्यांतच व्यवहार करणाऱ्या बँकांना १ एप्रिल, १९५३ पासून २४ वें कलम लागू झालें. त्रावणकोर–कोचीन बँकर्स ॲसोसिएशनच्या विनंतीस अनुसरून, त्रावणकोर–कोचीनमधील वरील प्रकारच्या बँकांना २४ (१) हें कलम १ एप्रिल, १९५४ पर्यंत लागू होऊं नये, अशी शिफारस रिझर्व्ह बँकेनें मध्यवर्ती सरकारास केली. त्यांनीं देण्यांच्या किमान १०% रक्कम तरत्या जिंदगींत गुंतवावी अशी मात्र अट घातली. रिझर्व्ह बँकेची ही शिफारस सरकारनें मान्य केली.

## बँकांच्या कर्ज देण्याच्या धोरणाबाबत योजना

बँकांच्या कर्ज देण्याच्या धोरणाचे अनिष्टतेबाबत फक्त दोन बँकांवर नियंत्रणात्मक योजना करावी लागली. एका बिगर-शेडच्यूल्ड बँकेला नवीं कर्जे देण्यास बंदी करण्यांत आली आणि एका शेडच्यूल्ड बँकेला बजावण्यांत आलें कीं, तिनें तिच्या डायरेक्टरांना नवीं कर्जे दिलीं, तर तिला दुसऱ्या शेडच्यूलमधून वगळण्यांत येईल. १ लक्ष रु. पेक्षा जास्त कर्जांच्या दैनिक अहवालांवरून, शेडच्यूल्ड बँका सोडतीच्या व्यवहारांस पैसा पुरवितात असें मुळींच आढळलें नाहीं. कर्जांत गुंतलेली रक्कम प्रमाणाबाहेर जाऊं देऊं नका, विना-तारण कर्जे कमी करा आणि स्थावरावरील कर्जेंहि आखडतीं घ्या, असा सल्ला देण्यापलीकडे रिझर्व्ह बँकेस अधिक कांहीं करावें लागलें नाहीं. तारण आणि कर्जदार ह्यांत विविधता राखणें, बँकांकडे ठेवलेल्या तारणाचें स्वतंत्र मूल्यमापन करण्याची आवश्यकता, तारण ठेवलेल्या मालमत्तेचा व मालाचा पुरेसा विमा उतरण्याची जरूरी, कर्जदारांच्या पतीसंबंधीं अद्ययावत् माहिती तयार ठेवणें, इत्यादींचें महत्त्व बँकांच्या निदर्शनास आणून देण्यांत आलें.

### बिल मार्केट योजनेंत सुधारणा

जानेवारी, १९५२ मध्यें सुरू केलेल्या बिल मार्केट योजनेच्या व्यवस्थेंत कांहीं सुधारणा करण्यांत आल्या. पूर्वीच्या वर्षांच्या अनुभवाचा फायदा होऊन, ही योजना अधिक कार्यक्षमतेनें अंमलांत राहूं शकली १९५२–५३च्या मोसमांत पैशाची तंगी पूर्वीच्या वर्षी-इतकी भासली नाहीं; त्यामुळें हुंड्यांच्या तारणावर कमी रक्कम घेण्यांत आली. बिल मार्केट योजनेच्या अटी जाचक असल्यानें फक्त कांहीं थोड्या मोठ्या बँकाच तिचा फायदा घेऊं शकतात, असें इंडियन बँक्स असोसिएशननें रिझर्व्ह बँकेच्या निदर्शनास आणलें. तेव्हां, ५ कोटी रुपयांपेक्षा ज्यास्त ठेवी असणाऱ्या शेड्यूल्ड बँकांना बिल मार्केटच्या कक्षेंत आणण्याचें जून, १९५३ मध्यें ठरविण्यांत आलें.

---

### रिझर्व्ह बँकेचा नफा ( १९५२–५३ )

रिझर्व्ह बँकेस १९५२–५३ मध्यें १६·४७ कोटी रुपये उत्पन्न झालें. खर्च ३·९७ कोटी रुपये झाला. मध्यवर्ती सरकारला १२·५० कोटी रुपये मिळाले; गेल्या वर्षी ७·५० कोटी रुपये मिळाले होते.

बँकेच्या उत्पन्नांत ५·३६ कोटी रुपयांची वाढ झाली; गेल्या वर्षी त्यांत ३९ लक्ष रुपयांची घट झाली होती. मार्च, १९५२ मध्यें ग्रेट ब्रिटनमधील बँकरेट ४% झाला, त्यामुळें स्टर्लिंग ट्रेझरी बिलांचा डिस्कौंट रेटहि एकदम चढला, त्याचा परिणाम उत्पन्नाच्या वाढींत झाला.

खर्चांत २६·०१ लक्ष रुपये झालेली वाढ मुख्यत: " सिक्युरिटी प्रिंटिंग " व " एस्टॅब्लिशमेंट " ह्या सदरांत झाली. उत्पादनाचा वाढता खर्च व अधिक नोटांचा पुरवठा, ह्यामुळें " सिक्युरिटी प्रिंटिंगचा " खर्च वाढला.

---

### शेतकऱ्यांना खतासाठी आर्थिक साह्य

बिहार सरकारनें चालू सालीं २६,००० टन अमोनिअम सल्फेट शेतकऱ्यांना देण्यासाठीं विकत घेण्याचें ठरविलें आहे. हें खत राज्य सरकारला विकत घेतां यावें म्हणून भारतीय सरकारनें ४८,४८,००० रुपयांचें अल्पमुदतीचें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. बिहार सरकारजवळ पूर्वी घेतलेल्या खतापैकीं १४,००० टन खतहि आहे. बिहार सरकारनें कर्ज ३० जून, १९५४ पर्यंत फेडावयाचें आहे. व्याजाचा दर ३½ टक्के आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या पतीवर खत देण्याच्या अटीवरच वरील कर्ज भारत सरकारनें मंजूर केलें आहे. बिहारमधील स्टेट को–ऑपरेटिव्ह बँकेच्या देखरेखीखालीं काम करणारी को-ऑपरेटिव्ह क्रेडिट अग्रिकोल ह्या संस्थेकडे खताच्या विक्रीची व्यवस्था सोपविण्यांत आली आहे. सध्या ह्या संस्थेचीं १०० पुरवठाकेंद्रें सर्व राज्यभर पसरलेलीं आहेत. आणखी कांहीं केंद्रें जरूर लागलीं तर खोलण्यांत येणार आहेत. ह्या केंद्रांमार्फतच अमोनिअम सल्फेटचें वाटप करण्यांत येणार आहे. केंद्राशिवाय कांहीं खाजगी व्यक्तींकडेहि वाटपाचें काम सोपविण्यांत येणार असल्याचें समजतें. मात्र अशा ठिकाणीं वाटपाची दुसरी कांहीं सोय करणें अशक्य असलें पाहिजे. खताची विक्री वाढविण्याकरितां खेडेगांवच्या सहकारी संस्था आणि ग्रामपंचायती ह्यांचाहि उपयोग करण्यांत येणार आहे. अमोनिअम सल्फेटखेरीज सुपर-फॉस्फेटहि शेतकऱ्यांना त्यांच्या पतीवर पुरविण्यांत येणार आहे. ह्या खताच्या योग्य वाटपासाठींहि आणखी एक अल्प मुदतीचें कर्ज बिहार सरकारला देण्याचें भारतीय सरकारनें कबूल केलें आहे, असें समजतें.

### दि बॉंबे स्टेट को. बँक लि.

वरील बँकेस अहवालाचे वर्षी ६,३१,१२३ रु. नफा झाला. भागीदारांना ५% डिव्हिडंडसाठीं २,९६,४७९ रु. चा विनियोग केला जाईल. बँकेकडील ठेवींत, अहवालाचे वर्षी, १७९ लक्ष रु. ची वाढ होऊन एकूण ठेवी ९,२५,२६,५०८ रु. च्या झाल्या. सोसायट्यांस दिलेल्या एकूण कर्जांत २३·५५ लाखांची घट झाली. बँकेमार्फत रिझर्व्ह बँकेनें दिलेल्या मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कर्जांतहि ८१ लाखांची घट झाली. व्यक्तींना कर्जे कमी-कमी प्रमाणावर देण्याचें बोर्डाचें धोरण आहे. सर्व प्रकारचीं कर्जें मिळून १४० लाखांनीं कमी झालीं. ठेवी वाढल्या व कर्जांत घट झाली, त्यामुळें रिझर्व्ह बँकेकडून बँकेसाठीं व मध्यवर्ती बँकांसाठीं घेतलेलीं कर्जें १५१ लाखांनीं कमी झालीं व सरकारी रोख्यांतील गुंतवण १११ लाखांनीं वाढली. ( चेअरमन आर. जी. सरय्या. ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर: वा. पुं. वर्दे ).

---

### सहकारी शिक्षण वर्ग, धुळें

सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरींसाठीं नवग्रही, धुळें येथें ता. ८।९।५३ पासून एक शिक्षणवर्ग सुरू करण्यांत आला आहे. सदर क्लासचें उद्‌घाटन मुंबई राज्य सहकारी बँकेचे मॅनेजरसाहेब ह्यांचे हस्तें मोठ्या उत्साहानें करण्यांत आलें. श्री. जोशी, को. ऑप. ट्रे इन्स्पेक्टर धुळें, यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. मे. सिनिअर बँक इन्स्पेक्टर धुळें, मार्केटिंग इन्स्पेक्टर, सुपरवायझर व सेक्रेटरी टी. डी. ए. यांचीं समयोचित भाषणें झालीं. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत खेड्यांचा विकास सहकारी संस्थाच करूं शकतील; मात्र कार्यकर्त्यांमध्यें आत्मीयता, प्रामाणिकपणा, या गोष्टी असल्या पाहिजेत; असा बहुमोल उपदेश केला. आभारप्रदर्शनानंतर चहापान होऊन हा कार्यक्रम संपला. दररोजचा वर्ग को. ऑप. ट्रे. इन्स्पेक्टर हे चालवितात.

---

### रिफ्रेशर क्लास, साक्री

साक्री तालुक्यांतील सोसायट्यांचे सेक्रेटरींसाठीं सुरू असलेल्या रिफ्रेशर क्लासचा समारोप ता. १।९।५३ रोजीं करण्यांत आला. सदर क्लासमध्यें पूर्वी असलेल्या ज्ञानाची उजळणी व कायदाकानू व पोटनियम यांची माहिती, पंचवार्षिक योजना व विकासयोजना यांबद्दलची माहिती सांगण्यांत आली. श्री. जोशी, को-ऑप. ट्रे. इन्स्पेक्टर धुळें, यांनीं स्थानिक सहकारी कार्यकर्ते व अधिकारी यांचे मदतीनें हा क्लास चालविला होता.

---

**इराकमधील प्राचीन वस्तूंची भेट**—इराकच्या पुराण वस्तु संशोधन खात्यातर्फे दिल्ली येथील वस्तु-संग्रहालयांत ठेवण्यासाठीं ५९ पुरातन वस्तू पाठविण्यांत येणार आहेत. ह्या वस्तूंत कांहीं मातीचीं व कांहीं कांचेचीं भांडींहि आहेत. दिल्ली विद्यापीठांत संशोधनासाठींहि त्यांचा उपयोग करण्यांत येईल.

**'अमेरिकन रिपोर्टर' चा नौकरवर्ग**—अमेरिकेनें भारतांत अमेरिकेविषयीं माहिती प्रसृत करणाऱ्या आपल्या खात्यावरील खर्चांत कपात करण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें खात्याच्या दिल्ली येथील कार्यालयांत ५६ अमेरिकन नौकरांऐवजीं ४५ नौकरच रहातील. भारतीय नौकरांची संख्या ४७१ ऐवजीं ३८० च राहील. शिवाय 'अमेरिकन वार्ताहर 'च्या गुजराथी, मराठी, तेलगू आणि मलयम् आवृत्त्याहि बंद होण्याचा संभव आहे.

## सारस्वत को. बँक लि., मुंबई

### गृहौद्योगिक केंद्राची योजना

वरील बँकेस अहवालाचे वर्षी ७२,९१८ रु. निव्वळ नफा झाला. २१,३६७ रु. इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह फंडाला जमा करून व १०,००० इन्व्हेस्टमेंट रिझर्व्हमध्यें टाकून हा नफा ताळेबंदांत घेतलेला आहे. ६१/२% डिव्हिडंडला २४,५०० रु. लागतील. नफा-वांटणीनंतर बँकेचे एकूण फंड ५,४८,२६८ रु. चे होतील. वसूल भांडवल ७,२६,१५० रु. आहे. बँकेच्या ३,७४४ सभासदांपैकी ६६२ महिला आहेत. बँकेकडील ठेवींत १३३/४ लाखांची वाढ होऊन ठेवींची रक्कम १,२२,२४,२२१ रु. झाली आहे व खेळतें भांडवल १,२५,०६,९६४ रु. झालें आहे. समाईक भांडवलाच्या बँकांच्या पद्धतीवर ही बँक ग्राहकांना सर्व प्रकारच्या बँकविषयक सोई उपलब्ध करून देते. बचतीच्या विविध प्रकारच्या योजना व्यवस्थापक मंडळानें आंखल्या आहेत. महिलांना घरबसल्या फावल्या वेळांत उपयुक्त वस्तू तयार करून आपल्या कुटुंबांच्या उत्पन्नांत भर घालतां यावी, म्हणूनहि एक योजना तयार केली आहे.

१. या योजनेचा फायदा बँकेचे सभासद व त्यांच्या कुटुंबांतील महिला यांस घेतां येईल.

२. महिलांनीं तयार केलेलें भरतकाम, लोकरीचें वीणकाम, खाण्याचे पदार्थ, पापड, लोणचीं, सांडगे, वगैरे उपयुक्त पदार्थ बँकेनें विक्रीसाठी ठेवण्याची व्यवस्था केली आहे.

३. ह्या वस्तूंची किंमत बँकेनें नेमलेली समिति ठरवील. ह्या किंमतीच्या ५० टक्के रक्कम लगेच देण्यांत येईल व राहिलेली रक्कम माल विकल्यावर देण्यांत येईल.

४. अत्यंत हलाखीची सांपत्तिक स्थिति असल्यास समिति त्या वस्तूची पूर्ण किंमत देईल.

या योजनेचा महिला वर्ग योग्य तो फायदा घेऊन आपली आर्थिक परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न करील अशी व्यवस्थापक मंडळाला आशा आहे. त्याचप्रमाणें बँककडे विक्रीसाठी आलेला माल घेऊन सभासद या कार्यास सक्रिय पाठिंबा देतील असा विश्वास आहे.

( चेअरमन : वा. पुं. वर्दे. चिटणीस : शं. वि. संझगिरी. )

---

### पुणे सें. को. बँकेचें नवें डायरेक्टर बोर्ड

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें च्या रविवार दिनांक १३-९-५३ च्या मे. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या निवडणुकींत १९५३-५४ सालाकरितां खालील सभासद निवडून आले आहेतः—

(१) मा. रा. य. बोरकर, चेअरमन. (२) मा. शं. वि. भालेराव, व्हा. चेअरमन. (३) मा. ग. र. तुळशीबागवाले, (४) मा. शं. नि. अभ्यंकर, (५) मा. वि. ज. करंदीकर, (६) मा. स. वा. कुलकर्णी, (७) मा. एस. एल. ओगले, (८) मा. र. वा. जोशी, (९) मा. ना. ना. जगताप, (१०) मा. रा. र. गावडे, (११) मा. शं. वा. इनामके, (१२) मा. म. द. शेंटे, (१३) मा. कृ. य. रणसिंग, (१४) मा. द. आ. मगर, (१५) मा. शं. रा. बुट्टे, (१६) मा. दि. वि. इनामदार, (१७) मा. य. सं. पवार, (१८) मा. मो. वि. रबडे, मॅनेजिंग डायरेक्टर (पदसिद्ध).

वार्षिक ताळेबंद, अहवाल, नफा वाटणी, मंजूर होऊन डिव्हिडंड ६ टक्के प्रमाणें देण्याचें ठरलें. त्याचप्रमाणें भागाचें भांडवल रुपये चार लाखानें वाढवावें असें ठरलें.

**SAVE to help yourself and the NATION**



WITH THE

**HOME SAFE**

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum.*

---

कराड तालुका रूरल डेव्हलपमेंट बोर्ड, कराड, जि. उ. सातारा

### वार्षिक साधारण सभेची नोटीस

कराड तालुका डे. बोर्डाचे सर्व सभासद (व्यक्तिशः, लॉईफ व सोसायट्या) यांना विनंतीपूर्वक कळविणेंत येतें कीं सदर बोर्डाची वार्षिक साधारण सभा ता. २७-९-५३ रोजीं रविवारीं दुपारीं ४ वाजतां कराड अर्बन को. ऑ. बँकेचे नवीन गोडाऊनमध्यें श्री. रा. रा. डी. एस. उर्फ दादासाहेब जगताप बी.ए. एलएल. बी., प्रेसिडेंट, जि. लो. बोर्ड उ. सातारा यांचे अध्यक्षतेखालीं होणार आहे. तरी सर्व सभासदांनीं हजर राहणेंविषयीं विनंती आहे.

आपला
यशवंतराव बाबुराव पाटील
प्रेसिडेंट, तालुका डे बोर्ड कराड.

---

**मंदीची लाट परतविण्यासाठीं: आपल्या**

**बँकेची, विमाकंपनीची किंवा मालाची**

**जाहिरात**

# दीनबंधूच्या दिवाळी अंकांत

**झळकलीच पाहिजे**

सर्वांत स्वस्त, सर्वांगसुंदर, अत्यंत चटकदार व सर्वांत अगोदर प्रसिद्ध होणारा म्हणून दीनबंधूच्या दिवाळी अंकाची ख्याति आहे. जाहिरातीचें अत्युत्कृष्ट साधन म्हणून हिंद सरकारनें दीनबंधूस मान्यता दिली आहे.

जाहिरातीचे दराबद्दल आजच लिहा— "दीनबंधु"
४४४ रास्ता पेठ, पुणें २.

## बेकारीविषयक प्रश्नाच्या अभ्यासाची पहिली पायरी

### नियोजन मंडळाचा माहिती मिळविण्याचा प्रयत्न

बेकारीसंबंधीं आंकडेवारीसह अचूक माहिती मिळविण्यासाठीं, नियोजन मंडळाच्या मार्गदर्शनानुसार अनेक प्रकारच्या खास चौकशा सुरू करण्यांत येत आहेत. राष्ट्रीय नमुना पहाणी विभागाकडून (अर्थ खातें) व इतर यंत्रणांद्वारां केल्या जाणाऱ्या या चौकशांमुळें ग्रामीण, तसेंच शहरी विभागांतील बेकारीच्या प्रश्नांवर प्रकाश पडेल.

गेला कांहीं काल नियोजन मंडळानें बेकारीच्या प्रश्नाचा अभ्यास चालविला असून, शहरी विभागांतील बेकारी कमी करण्यासाठी एक ११ कलमी कार्यक्रम आंखला आहे. हा कार्यक्रम सध्यां राज्य सरकारें व मध्यवर्ती खात्यापुढें विचारार्थ व अंमल-बजावणीसाठीं आहे. तथापि अपुऱ्या माहितीमुळें या प्रश्नाच्या अभ्यासांत अडचणी येतात. सध्यां उद्योगविनिमय केंद्रांकडून मिळणाऱ्या आंकडेवारीचाच माहितीचें मुख्य साधन म्हणून उपयोग होत आहे. तथापि ही आंकडेवारी शहरी विभागापुरतीच असून शिवाय व्यापक नाहीं, हें मान्य करणें भाग आहे.

म्हणून नियोजन मंडळानें विशेष उपाययोजना चालू केल्या असून, त्यामुळें ग्रामीण आणि नागरी भागांतील बेकारीसंबंधींची आंकडेवारी उपलब्ध होईल व योग्य प्रकारचें रोजगारविषयक धोरण आंखण्यास त्याचा उपयोग होईल. मंडळानें चालू केलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणें आहेत.

#### नागरी बेकारीचें क्षेत्र

(अ) ग्रामीण विभाग सोडून जाण्याच्या प्रवृत्तीचा अभ्यास. उपलब्ध आंकडेवारीवरून असें दिसून येतें कीं, १९४१ ते १९५१ या दहा वर्षांत सुमारें १ कोटी लोकांनीं खेडीं व गांवांतून स्थलांतर केलें. या स्थलांतराचें प्रमाण, त्याचीं कारणें व आर्थिक आणि सामाजिक परिणाम यांचा विद्यापीठांच्या सहकार्यानें अभ्यास करण्याचा मंडळाचा बेत आहे. या अभ्यासासाठीं निरनिराळ्या आकाराचीं व वेगवेगळ्या परिस्थितींतील शहरें व गांवें निवडण्यांत येतील.

(ब) राष्ट्रीय नमुना पाहणी संघटना कलकत्ता विभागांत निवडक नमुना पाहणीपद्धतीनुसार ४,००० घरांची पाहणी करील. याबाबतच्या प्रत्यक्ष कामास आरंभहि झाला असून तें ऑक्टोबरअखेरीस संपावें अशी अपेक्षा आहे. त्याचे निष्कर्ष फेब्रुवारी १९५४ मध्यें उपलब्ध होण्याचा संभव आहे.

(क) राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेकडून थोड्याच दिवसांत दिल्लींतील उद्योगविनिमय केंद्रांच्या चालू नोंदणी पुस्तकांची नमुना चौकशी सुरू होणार असून, तीन ते चार महिन्यांत त्याचे निष्कर्ष उपलब्ध होतील असें वाटतें.

(ड) निवडक नमुना पाहणींच्या तत्त्वानुसार निवडलेल्या १८ लहानमोठ्या शहरांतील बेकारीविषयक खास प्राथमिक चौकशीचें काम राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेनें चालू केलें आहे.

(ई) नागरी विभागांतील छोट्या धंद्यांसंबंधीं खास चौकशी करण्याचा विचार आहे.

(फ) तसेंच, नागरी विभागांतील बेकारी कमी करण्यासाठीं, ११ कलमी कार्यक्रम नमूद केलेल्या नियोजन मंडळाच्या पत्रकानुसार, आपापल्या प्रदेशांतील बेकारीची समस्या व ती नाहींशी करण्यासाठीं त्यांना वाटणाऱ्या उपाययोजना याबाबतचीं मतें राज्य सरकारांकडून लवकरच कळतील अशी मंडळास अपेक्षा वाटते.

ग्रामीण विभागांतील बेकारीचा विचार करतां खास चौकशींत पुढील गोष्टींचा समावेश करण्यांत येईल:—

(१) त्रावणकोर-कोचीन राज्यांतील महत्त्वाची, ग्रामीण अंगें असलेल्या बेकारीच्या प्रश्नाची चौकशी.

(२) पाटबंधारे व विद्युत् कार्यक्रमांतून रोजगार मिळण्याच्या शक्यतेचा खास अभ्यास.

त्याशिवाय सुमारें तीन वर्षांपूर्वी करण्यांत आलेल्या शेत-मजुरांच्या व्यापक चौकशीमुळें मध्यवर्ती सरकारकडे ग्रामीण विभागांतील बेकारीसंबंधीं बरीच महत्त्वाची माहिती उपलब्ध आहे.

---

#### युनियन बँक ऑफ बंगाल लि.

युनियन बँक ऑफ बंगाल लि., कलकत्ता ह्या बँकेवर रिझर्व्ह बँकेनें एक नोटीस बजावून तिला लायसेन्स नाकारला आहे. बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या २२ (२) कलमाखालीं ही योजना करण्यांत आली आहे. ह्यापुढें, बँकेला बँकिंगचा व्यवहार करतां येणार नाहीं, अर्थात् ठेवी पण स्वीकारतां येणार नाहींत.

युनियन बँक ऑफ बंगाल हिची स्थापना १९३० मध्यें झाली. ७ लक्ष १८ हजार रु. वसूल भांडवल, ७७ हजार रिझर्व्ह, २२ लक्ष २२ हजार रु. ठेवी, एकूण खेळतें भांडवल ३२ लक्ष, ५१ हजार रु., ७ शाखा, असा १९५२ अखेरच्या ताळेबंदांतील तिचा तपशील आहे.

---

#### पाकिस्तानी चित्रपट-व्यवसाय

पाकिस्तानी चित्रपट-व्यवसाय सुधारण्यासाठी होलिवुडचे पांच तज्ज्ञ नियुक्त करण्यांत आले आहेत. "यु. ने. टेक्निकल एड प्रोग्रॅम" खालीं ही व्यवस्था करण्यांत आली आहे.


# कण आणि क्षण

(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)

वेगवेगळ्या मासिकांतून प्रसिद्ध झालेले

**श्री. श्री. वा. काळे, संपादक "अर्थ"**

ह्यांचे कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील

**— विविध लेख —**

जीवन सुखी होण्यासाठी आवश्यक अशा आचार-विचारांचें अगदीं सोप्या भाषेत केलेलें विवेचन.

कांहीं विषय

★ सौंदर्य नसलें तरी चालेल.
★ ह्या सुखास श्रीमंतीची आवश्यकता नाहीं.
★ उपयुक्त तेंच शिक्षण द्या.
★ जरा जपूनच बोला.
★ पाहुणचाराचें व्यावहारिक अर्थशास्त्र.
★ सुमतीबाईच का हव्यात?
★ मिळतें घ्या आणि शहाणे व्हा.

इत्यादि सुमारें ३५ लेख.

पृष्ठ संख्या सुमारें १५० } ऑक्टोबरमध्यें प्रसिद्ध होईल. } किंमत १ रु. ८ आ.

पत्ता:—"अर्थ" पुणें ४.

### भारतामधील मॅंगेनीझचा सांठा

भारतामधील मॅंगेनीझ ह्या खनिजाच्या सांठ्याचा पूर्वी जो अंदाज करण्यांत आला होता, त्यापेक्षा बराच अधिक सांठा भारतांत आहे असें आढळून आलें आहे. भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ नॅचरल रिसोर्सेस अँड सायंटिफिक रिसर्च ह्या खात्यातर्फे करण्यांत आलेल्या अहवालांत वरील माहिती नमूद करण्यांत आली असून तिला आर्थिक दृष्टीनें फार महत्त्व देण्यांत येत आहे. पूर्वी करण्यांत आलेल्या भूगर्भविषयक पहाणींत असा अंदाज करण्यांत आला होता कीं, भारतामधील मॅंगेनीझचा सांठा सुमारें २·५ कोटी टन असावा; पण नवीन अंदाजाप्रमाणें हा सांठा ६ कोटी टनांच्या आसपास असावा. जगांत मॅंगेनीझचें उत्पादन करणारे जे देश आहेत, त्यांत भारत हा एक मोठा देश आहे. गेल्या वर्षी भारतामधून १४,००,००० टन मॅंगेनीझची निर्यात करण्यांत आली आणि त्याच्या मोबदला भारताला २१ कोटी रुपयांची प्राप्ति झाली. गेल्या कांहीं वर्षांत मॅंगेनीझच्या उत्पादनांत आणि निर्यातींत एकसारखी वाढ होत असल्याचें दिसून आलें आहे. मॅंगेनीझची बहुतेक निर्यात अमेरिकेला होते. मॅंगेनीझच्या मातीच्या निरनिराळ्या प्रती असतात. त्यापैकीं सर्वांत कमी प्रतीच्या मातींतूनहि मॅंगेनीझ काढण्याची पद्धत खात्यातर्फे शोधून काढण्यांत आली आहे. त्यामुळें पूर्वी जी माती निरुपयोगी म्हणून फेकून देण्यांत येत असे, तीमधूनहि आतां शुद्ध मॅंगेनीझ काढणें शक्य झालें आहे अशा प्रकारची कित्येक टन माती निरुपयोगी म्हणून टाकून देण्यांत आली होती, तीमधून २,००,००० मॅंगेनीझ नवीन पद्धतीनें निघालें. कच्च्या मॅंगेनीझवर संस्कार करण्याचा एक कारखाना काढण्याचा सरकार विचार करीत आहे. अशा प्रकारचें संस्कारित मॅंगेनीझ निर्यात केलें तर अशुद्ध माती निर्यात करण्यापेक्षा अधिक फायदा होईल, असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

---

### जर्मनीच्या मदतीनें मोटारीचा कारखाना

भारतामधील मोटारीचा एक कारखाना मरसिडिज बेंझ ह्या जर्मन मोटारीच्या कारखान्याच्या मदतीनें, भारतांत मोटारी तयार करण्याचा एक नवीन कारखाना काढण्याचा विचार करीत आहे असें समजतें. संकल्पित कारखान्यांत मोटारी, डिझेल इंजिन्स, शेतीचीं अवजारें, इत्यादि माल तयार करण्यांत येणार असून ८५ टक्के माल भारतीयच वापरण्यांत येणार आहे. कारखान्यामधील कामगारवर्ग अर्थातच येथील राहील. १९५४ च्या सुमारास नवीन कारखाना चालू होण्याचा संभव आहे. भारतीय कारखान्याचे चालक परदेशीय कंपनीशीं कोणत्या अटीवर करार करण्यांत यावा ह्याविषयीं भारतीय सरकारशीं वाटाघाटी करीत आहेत. अजून वाटाघाटींना निश्चित स्वरूप प्राप्त झालेलें नाहीं. मोटारी तयार करण्यासाठी जो भांडवली स्वरूपाचा माल लागतो, त्यापैकीं ८५ टक्के माल भारतांतच तयार करण्याचा चालकांचा इरादा आहे. सध्यां भारतांत परदेशीय कंपन्यांच्या मदतीनें जें इतर कारखाने चालविण्यांत येत आहेत, त्यांच्याशीं तुलना करतां ह्या कारखान्याचें ध्येय अधिक व्यापक आहे असें म्हणतां येईल. बॉन येथें भारताची वकिलात आहे. तेथें ह्यासंबंधी चौकशी करतां असें उत्तर देण्यांत आलें कीं, हें प्रकरण भारतीय सरकार स्वतःच हाताळीत आहे. मरसिडिझ बेंझ कारखान्याची एक शाखा जर्मनींतील स्टटगार्ट येथें आहे. ह्या शाखेंत भारतामधील आठ तंत्रज्ञ सध्यां शिक्षण घेत आहेत. त्यावरून कुशल तंत्रज्ञ तयार करण्याचें काम चालूं झालेलें दिसतें.


१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

वे स्ट र्न इं डि या

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधींची प्रचीति पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| ह्यातींतील पॉलिसी | ह्यातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.
मॅनेजर

वेस्टर्न इंडिया लाईफ
इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर-ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें-१
फोन नंबर— १४०२

बँक ऑफ पूना लि.
(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

—संचालक मंडळ—

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर—चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेवः—बँक १ ते ३ वर्षें मुदतीच्या ठेवी स्वीकारते. व्याजाबद्दल चौकशी करावी.

एक वर्षापेक्षा कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.
मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २.
गो. गं. साठे, मॅनेजर.

### भारतांत मासे अधिक खपूं लागले

भारताची फाळणी झाल्यापासूनच्या सहा वर्षांच्या काळांत माशांचा खप खूपच वाढला आहे. सहा वर्षांपूर्वीच्या मानानें हल्लीं कितीतरी अधिकपट मासे बाजारांत खपतात. डबाबंद मासे आणि इतर प्रकारचे मासे ह्या सर्वांनाच अधिक मागणी येऊं लागली आहे १९४७-४८ सालीं. भारतानें ४२,४६१ हंड्रेडवेट वजनाचे मासे आयात केले. त्यांची किंमत सुमारें १४,१५,००० रुपये झाली. ह्यांत सर्व प्रकारचे म्हणजे डबाबंद, वाळलेले, खारवलेले, बिनखारवलेले आणि ताजे मासे होते. १९५२-५३ सालीं भारतानें १,००,२५० हंड्रेडवेट वजनाचे मासे आयात केले. त्यांची किंमत १,८६,०९,००० रुपये झाली. आयात केलेल्या माशांची मागणी एकसारखी वाढतच चालली आहे. पुढील कोष्टकांत सालागणिक वाढती मागणी दाखविली आहे.

| साल | वजन (हंड्रेडवेट) | किंमत (रुपये) |
|---|---|---|
| १९४७-४८ | ४२,४६१ | १४,१५,००० |
| १९४८-४९ | ६०,३०५ | ३१,९८,००० |
| १९४९-५० | ६६,३०१ | १,२०,९९,००० |
| १९५०-५१ | ८६,४२० | १,३२,०७,००० |
| १९५१-५२ | १,००,२३५ | १,७५,६७,००० |
| १९५२-५३ | १,००,२५० | १,८६,०९,००० |

गेल्या सहा वर्षांचा काळ म्हणजे अन्न-टंचाईचा काळ. अन्नधान्यांची टंचाई पडल्यामुळें अधिक लोकांनीं आपल्या खाण्यांत मासे आणले असण्याचा संभव आहे. पण माशांच्या आयातीची व खपाची अधिक तपशीलवार चिकित्सा करण्यांत आल्यास आहारविषयक बदलासंबंधीं उपयुक्त माहिती मिळूं शकेल.

---

### अधिकाधिक परकीय लोक हिंदी शिकूं लागले

कोरिआंतील युद्धांत तडजोड घडवून आणण्याच्या कामीं भारतानें जो पुढाकार घेतला त्यामुळें रशिआंत व पूर्व युरोपीय देशांत भारताचें वजन वाढल्यासारखें दिसतें. ह्या देशांच्या शिक्षणक्रमांत भारतविषयक अभ्यासाला अधिकाधिक महत्त्व देण्यांत येऊं लागलें आहे. भारतीय भाषा शिकण्यास विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यांत येत आहे. शिक्षण-संस्थांतून बंगाली शिकविण्याची सोय करण्यांत येत आहे. पूर्व-युरोपांतील देशांतून सध्या कांहीं प्रतिनिधि-मंडळें पूर्व-जर्मनींत आलेलीं आहेत. त्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, येत्या पांच वर्षांत त्यांच्या देशांतील कितीतरी लोक प. युरोपांतील देशांच्या भाषा शिकण्याऐवजीं भारतीय आणि इतर आशिआई भाषा शिकतील. पूर्व-जर्मनीमधील हंबोल्ट विद्यापीठाचा एक प्रवक्ता म्हणाला कीं येत्या २६ तारखेपासून विद्यापीठांत बंगाली ही एक महत्त्वाची आधुनिक भाषा म्हणून शिकविण्याची सोय करण्यांत येईल. हिंदी बहुधा पुढच्या वर्षापासून शिकविली जाईल. झेकोस्लोव्हाकिआंतील प्राग विद्यापीठानें हिंदी आणि बंगाली प्रोफेसरांच्या दोन कायमच्या जागा निर्माण केल्या आहेत. सध्यां त्या विद्यापीठांत परकीय भाषा शिकविण्याचें जें खातें आहे, त्यांत बंगालीला जास्तींत जास्त प्राधान्य देण्यांत येत आहे. पोलंडमधील वॉरसा विद्यापीठानेंहि हिंदी व बंगाली भाषा शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या दोन जागा निर्माण केल्या आहेत. पोलंडप्रमाणें रुमानिआंत आणि बल्गेरियांतहि वरील भाषा शिकविण्याची सोय करण्यांत आली आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

—: महाराष्ट्राची अग्रेसर कंपनी :—
दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि.
पहिल्याच मूल्यमापनांत बोनस जाहीर करून, कंपनीनें असाधारण विक्रम करून दाखविला आहे. दुसऱ्या मूल्यमापनाचें काम चालू झालें असून, त्यांत निश्चित प्रगति दिसेल अशी खात्री वाटते.
६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.
शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

दि
युनायटेड कमर्शिअल बँक लि.
कलकत्ता.
अधिकृत भांडवल ... ८ कोटी रु.
खपलेलें भांडवल ... ४ कोटी रु.
वसूल भांडवल ... २ कोटी रु.
रिझर्व्ह फंड ... ७५ लक्ष रु.
: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
जी. डी. बिर्ला ( चेअरमन )
ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन — रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन
अनंत चरण लॉ — महादेव एल. डहाणूकर
बैजनाथ जालन — मदनमोहन आर. रुइया
गोविंदलाल बंगूर — मोहनलाल एल. शहा
पी. डी. हिमतसिंगका — मोतीलाल तापुरिया
रामेश्वरलाल नोपानी — नवीनचंद्र मफतलाल
: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर
भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.